ARTHA, Poona 4

उद्योगधंदे, बँकिंग, अर्थशास्त्र, व्यापार, सहकार, इत्यादि विषयांस वाहिलेलें प्रमुख मराठी वृत्तपत्र

स्थापना : १९३५

# अर्थ

“अर्थ एव प्रधानः” इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति।
—कौटिलीय अर्थशास्त्र

प्रत्येक महिन्याच्या पहिल्या व तिसऱ्या बुधवारीं प्रसिद्ध होतें.

वार्षिक वर्गणी : ६ रु.

टेलि. ५५६२७

दुर्गाधिवास, पुणें ४.

LICENCED TO POST WITHOUT PREPAYMENT.
Reg. No. B. 3434. Licence No. 53.

वर्ष ३१ | पुणें, बुधवार २ जून, १९६५ | अंक ११

## विविध माहिती

**रशिआकडून तेलाची वाढती आयात**—चालू आर्थिक वर्षांत रशिआकडून १० लाख टन केरोसिन आणि डिझेल तेल आयात करण्याचा निर्णय इंडिअन ऑइल कार्पोरेशननें घेतला आहे. आयातीची किंमत रुपयांत देण्यांत येणार असल्यानें भारताच्या परदेशीय चलनाच्या सांठ्यावरील ताण कमी होण्यास मदत होईल. हा माल आयात करण्यासाठी परदेशीय कंपन्यांना देण्यांत आलेले परवाने सहा महिन्यांपुरते रद्द करण्यांत आले आहेत. आतांपर्यंत केरोसिन व डिझेल घेऊन येणाऱ्या ६ रशिअन बोटी भारतांत आल्या आहेत.

**बंगालपुढील प्रश्न**—पश्चिम बंगालला दोन प्रश्नांना सतत तोंड द्यावें लागत आहे. पहिला प्रश्न वाढत्या बेकारीचा. राज्यांतील उद्योगविनिमय केंद्रांतील माहितिप्रमाणें १९६४ च्या अखेरीस ५·०८ लाख लोक बेकार होते. त्यांची संख्या १९६१ सालीं ३·२८ लाख होती. अन्नधान्याच्या बाबतींत बंगाल इतर राज्यांवर अवलंबून आहे. तांदुळाचा तुटवडा हा बंगालच्या अनुभवाचा नेहमींचा प्रश्न आहे. पण अलीकडे मासे, मांस, डाळी, मोहरीचें तेल, ह्यांचाहि तुटवडा जाणवूं लागला आहे. केरळच्या खालोखाल बंगाल हा दाट लोकवस्तीचा प्रदेश आहे.

**२॥ कोटींच्या हिऱ्यांची देणगी**—तिरुमल तिरुपती येथील वेंकटेश्वराच्या देवालयाला तामीळनाडमधील एका साधूनें पैलू न पाडलेले दोन हिरे भेट म्हणून दिले आहेत. दोन्ही हिऱ्यांचें मिळून वजन ६५० ग्रॅम आहे. हिऱ्यांची नक्की किंमत समजलेली नाहीं. परंतु ती २·५ कोटी रुपयांपर्यंत असावी. आंध्र प्रदेशाचे मुख्यमंत्री श्री. रेड्डी ह्यांच्याजवळ साधूनें ही देणगी दिली व आपलें नांव गुप्त ठेवण्याची विनंती केली.

**राजस्तानी दारूची निर्यात**—राजस्तानमील गंगासागर सरकारी साखर कारखान्यानें ‘जगमोहन’ नांवानें प्रसिद्ध असलेली दारू तयार करण्याचें ठरविलें आहे. ही दारू फक्त निर्यातीसाठी तयार करण्यांत येणार आहे. दारू तयार करण्यासाठी साखर, तूप, सुकीं फळें, मसाल्यांचे पदार्थ, इत्यादींचा उपयोग करावा लागतो. ह्या दारूच्या निर्यातीमुळें भारताला दरसाल सुमारें ३५ लाख रुपयांचें परदेशीय चलन मिळेल.

**स्कूटर्स तयार करण्यासाठी मदत**—युगोस्लाव्हिआनें भारताला अनेक प्रकारच्या उत्पादनासाठी मदत देण्याची तयारी दाखविली आहे. त्यांत स्कूटर्सच्या कारखान्यासाठी मदत देऊं केली आहे. त्याशिवाय सपाट बुडांच्या बोटी, बूट, तयार कपडे, फळांचे रस, इत्यादींचे कारखाने काढण्याच्या कामीं सहकार्य करण्यास युगोस्लाव्हिआ तयार आहे.

**आयात करांत कपात**—अविकसित देशांतून आयात करण्यांत देणाऱ्या पक्क्या मालावरील आयात करांत कपात करण्याचा विचार ऑस्ट्रेलिआचें सरकार करीत आहे. अशा प्रकारच्या मालाची एक यादी तयार करण्यांत येणार आहे. कपात अमलांत आल्यावर तिचा फायदा ११८ देशांना मिळेल. ह्या देशांत इंडोनेशिआ, भारत, मलेशिआ, थायलँड, दक्षिण व्हिएटनाम, ह्यांचा समावेश आहे.

**तांत्रिक प्रशिक्षणाची शिफारस**—संरक्षणविषयक तांत्रिक प्रशिक्षण देणाऱ्या संघटनेच्या जनरल कौन्सिलची बैठक दिल्ली येथें भरली होती. संरक्षणविषयक कारखान्यांतून काम करण्यासाठी आणखी १,०७० विद्यार्थ्यांना निरनिराळ्या केंद्रांतून प्रवेश देण्यांत यावा अशी शिफारस कौन्सिलनें केली आहे. सध्यां ५ हजार विद्यार्थ्यांना २९ कॉलेजांतून अर्धवेळ शिक्षण देण्यांत येत आहे.

**कॅन्सरबाबत संशोधन केंद्र**—कॅन्सर रोगाबाबत संशोधन करण्यासाठी एक आंतरराष्ट्रीय केंद्र उभारण्याचें जागतिक आरोग्य संघटनेनें ठरविलें आहे. ह्या रोगाचीं कारणें, त्यावरील उपचार आणि त्याचें निवारण, ह्यासंबंधीचें संशोधन केंद्रांत करण्यांत येणार आहे. तें उभारण्याच्या कामीं फ्रान्स, अमेरिका, पश्चिम जर्मनी, ब्रिटन, इत्यादि प्रमुख देशांचा पाठिंबा आहे. संघटनेच्या सर्व सभासदांना केंद्रांत प्रवेश मिळेल.

**सिमेंटचे खाजगी कारखाने**—भारत सरकारनें सिमेंटचे ६ कारखाने काढण्याची परवानगी खाजगी मालकीच्या कारखान्यांना दिली आहे. हे सर्व कारखाने मिळून दरसाल १·८ कोटी टन सिमेंटची निर्मिति करूं शकतील. संकल्पित कारखान्यांपैकी ५ संपूर्णपणें नवे असून एक मात्र जुन्या कारखान्याचा विस्तार केलेला असेल. नव्यांपैकी ३ कारखाने बिहार राज्यांत निघणार आहेत.

**घड्याळांचा आणखी एक कारखाना**—स्वित्झरलंडमधील घड्याळाच्या कारखानदारांचें एक प्रतिनिधिमंडळ भारतांत आलें आहे. सार्वजनिक विभागांत घड्याळें तयार करण्याचा आणखी एक कारखाना स्थापन करण्यासाठीं भारत सरकारशीं तें वाटाघाटी करणार आहे. बंगलोर येथील घड्याळांच्या सरकारी मालकीच्या कारखान्यांत दरसाल २ लाख, ४० हजार घड्याळें तयार होतात. ह्या कारखान्याला जपानचें सहकार्य लाभलें आहे. घड्याळांची मागणी वाढत चालल्यामुळें आणखी कारखाना काढणें जरूर वाटूं लागलें आहे.

### डॉलर्सच्या उत्पन्नांत घट होण्याची शक्यता

अमेरिका भारताला पब्लिक लॉ ४८० प्रमाणें अमेरिकेंतील जादा शेतकी उत्पादनांतून मदत करीत असते. ह्या मदतीच्या कर.रांत अलीकडे एक दुरुस्ती करण्यांत आली आहे. ही दुरुस्ती अशी आहे कीं, अमेरिकेनें दिलेल्या शेतीमालाच्या भारतामधील विक्रीच्या रकमेंतून भारतांत येणाऱ्या अमेरिकन प्रवाश्यांना रुपयांचा पुरवठा करण्यांत यावा. दिल्ली येथील अमेरिकन वकिलात आणि मुंबई, मद्रास व कलकत्ता येथील अमेरिकन राजदूतांच्या कचेऱ्या ह्यांमधून ही सोय उपलब्ध करून देण्यांत येणार आहे. ह्या सवलतीमुळें हौशी परदेशी प्रवाश्यांपासून मिळणाऱ्या डॉलर्सच्या उत्पन्नांत घट होईल अशी भीति व्यक्त करण्यांत येत आहे. भारतांत येणारे अमेरिकन प्रवासी आपल्याजवळील डॉलर्स अमेरिकन सरकारजवळच ठेवतील आणि भारतांत आल्यावर त्यांच्या बदली रुपये घेतील असा संभव आहे. मुंबईच्या अमेरिकन राजदूताच्या कचेरींतून अलीकडे कोणाहि अमेरिकन प्रवाश्यानें डॉलर्स देऊन रुपये घेतल्याचें आढळून आलेलें नाहीं. त्यावरून वर केलेल्या भीतीला पाठिंबा मिळत आहे. १९६०-६१ मध्यें भारताला अमेरिकन हौशी प्रवाश्यांपासून १५·३ कोटी रुपयांच्या डॉलर्सची प्राप्ति झाली. १९६१-६२ मध्येंहि १५ कोटी रुपयांच्या डॉलर्सची प्राप्ति झाली. अलीकडे ह्या प्राप्तींत थोडीबहुत वाढच झालेली आहे. परंतु, मदत-करारांत करण्यांत आलेल्या दुरुस्तीमुळें डॉलर्सची प्राप्ति घटू लागेल. गेल्या कांहीं महिन्यांत अमेरिकेच्या आंतरराष्ट्रीय देण्याघेण्याचा समतोल कांहींसा ढळला आहे. तो सावरून धरण्यासाठी करारांत दुरुस्ती करण्यांत आली असावी असा तर्क करण्यांत येत आहे. आंतरराष्ट्रीय देण्याघेण्याच्या व्यवहारांत डॉलर्सचें हुकमी स्थान टिकविण्याचा प्रयत्न अमेरिका करीत आहे. त्याचा हा परिणाम असावा.

### स्वदेशी दारूचा आग्रह

अमेरिकेच्या राष्ट्राध्यक्षांचे निवासस्थानीं फक्त अमेरिकन दारूच पेय म्हणून दिली जाते. अमेरिकेच्या परदेशांतील वकिलातींतहि खपणाऱ्या दारूपैकी किमान ८०% दारू अमेरिकन असली पाहिजे असा नियम आहे.

### बँकांवरील ताण असह्य होत चालला

ठेवी वाढविण्याच्या आणि कर्जाची मागणी पुरविण्याच्या बाबतींत बँकांना अधिकाधिक अडचणी कशा येत आहेत, ह्याचें विवेचन पंजाब नॅशनल बँक लि. चे चेअरमन, श्री. कमलनयन बजाज, ह्यांनीं केलें आहे. रिझर्व्ह बँकेनें शेड्यूल्ड बँकांना द्यावयाच्या कर्जाच्या अटी वाढविल्या असल्या, तरी सर्व शेड्यूल्ड बँकांचें मिळून कर्जाचें ठेवींशीं प्रमाण एप्रिलअखेर ८०% पेक्षा जास्त होतें! कर्जदारांना कितीहि व्याज आकारलें, तरी कर्जाची मागणी वाढतच आहे. ह्याचा अर्थ, औद्योगिक क्षेत्राची भांडवलाची गरज भागणें कठीण होत आहे. ठेवींत भरपूर वाढ होणें त्यामुळें अपरिहार्य झालें आहे. बाजारांत भांडवल उभारण्यासहि उत्तेजन कसें मिळेल, ह्याचा विचार व्हायला हवा. तरच, बँकांवरील ताण कमी होईल. मोसमवारी होणाऱ्या कर्जपुरवठ्यांतील वाढीचा प्रश्न बिकट झाला आहे, तो सोडविण्यासाठी योग्य धोरणाची आवश्यकता आहे.

### खोबरेल तेलाच्या गिरण्या बंद पडल्या

केरळ राज्यांत खोबरे गाळून तेल उत्पादन करणाऱ्या २,००० तरी गिरण्या आहेत. त्यांपैकी ८० टक्के गिरण्या खोबऱ्याच्या अपुऱ्या पुरवठ्यामुळें बंद पडल्याची वार्ता आहे. खोबरें गाळण्याचा हंगाम फेब्रुवारीपासून जूनपर्यंत जोरांत चालतो. पण, चालू हंगामांत बहुतेक गिरण्यांतून सामसूम आहे. खोबऱ्याचा अपुरा पुरवठा आणि त्याच्या भरमसाठ किंमती ह्यांचा हा परिणाम आहे. खोबऱ्याच्या अपुऱ्या पुरवठ्याचीं अनेक कारणें सांगण्यांत येत आहेत. मलबारमधील प्रतिकूल हवामानामुळें ह्या वर्षी खोबऱ्याचें उत्पादनच घटलें आहे. त्याचबरोबर मुंबई भागांतून येणारी मागणी वाढत चालली आहे. मुंबई भागांतील तेलगिरण्यांनीं केरळमधील खोबऱ्याच्या पुरवठ्यापैकी ७३ टक्के माल अगोदरच विकत घेतला असल्याचें सांगण्यांत येत आहे. इतकेंच नव्हे, तर खोबरेल तेलाचा धंदा केरळमधून मुंबई भागांत जात आहे असें म्हणतात.


दातांच्या स्वच्छतेसाठी

★ माकडछाप म्हणजेच काळी टूथ पावडर ★



Rates of Interest raised on **Cumulative Deposits** also!
Rules liberalised !!

**Rs. Five paid in every month regularly into our New series of Cumulative Deposits will bring YOU,**

| One year | Two years | Three years | Four years | Five years |
|---|---|---|---|---|
| Rs. | Rs. | Rs. | Rs. | Rs. |
| 61·45 | 126·24 | 195·25 | 266·93 | 345·75 |

**Enquire at any of our 38 branches**

# The Belgaum Bank Limited,

( Ested. 1930 : Sch. Bank )

Regd. Office : **Raviwar Peth, Belgaum.**

Bombay Branch : **259-53, Narsinath Street, Mandvi, Bombay-9**

# अर्थ

बुधवार, २ जून, १९६५



संस्थापक :
प्रा. वामन गोविंद काळे
संपादक :
श्रीपाद वामन काळे


## निराधार स्त्रियांना मदत करणारी संघटना

ग्रामीण भागांतील निराधार स्त्रियांना मदत करणारी एक संघटना लखनौ जिल्ह्यांत समाजोपयोगी काम चांगल्या रीतीनें करीत आहे. संघटना बिनसरकारी असून निराधार स्त्रियांना आर्थिक दृष्ट्या स्वावलंबी करण्याचा तिचा हेतु आहे. लखनौ येथें संघटनेमार्फत २२ औद्योगिक केंद्रें चालविण्यांत येतात. सुमारें ८०० स्त्रिया ह्या केंद्रांतून निरनिराळ्या प्रकारच्या हस्त-व्यवसायाचें शिक्षण घेत आहेत. कापड विणणें, कपडे बेतणें व शिवणें, खेळणीं तयार करणें, चामड्याच्या व प्लॅस्टिकच्या उपयुक्त वस्तु तयार करणें, इत्यादि कामें त्यांना शिकविण्यांत येतात. स्त्रियांना पूर्ण वेळ काम करणें घरच्या कामामुळें शक्य होत नाहीं, निदान अवघड जातें, ही वस्तुस्थिति लक्षांत घेऊन त्यांचे कामाचे तास सकाळीं ११ते दुपारीं ४ वाजेपर्यंतच ठेवण्यांत आलेले आहेत. हीं औद्योगिक केंद्रें बऱ्याच प्रमाणांत यशस्वी झालेली आहेत. त्यांत काम करणाऱ्या स्त्रिया दरमहा ६० ते ८० रुपयांपर्यंत कमाई करूं शकतात. अशा प्रकारचें पहिलें औद्योगिक केंद्र एक वर्षापूर्वी स्थापन करण्यांत आलें होतें. त्या वेळीं त्यामधील सभासदांची संख्या अवघी ४२ होती. परंतु त्यानंतर उपक्रमाची उपयुक्तता पटत चालल्यानें सभासद करून घेण्याच्या मागण्या वाढत चालल्या आहेत. स्त्रियांना मदत करणाऱ्या ह्या संघटनेंत त्यांना स्वावलंबी करण्यावर भर देण्यांत येतो. संघटनेला सरकारी अगर निमसरकारी अशी कोणतीच मदत मिळत नाहीं. तरीहि संघटनेचा व्याप वाढत चाललेला आहे. प्रत्येक बाबतींत सरकारवर अवलंबून न राहतांहि उपयुक्त सामाजिक कार्य करतां येतें, हें संघटनेनें दाखवून दिलें आहे.

## रशिआनें दिलेल्या मदतीचा अपुरा उपयोग

रशिआनें भारताला दिलेल्या आर्थिक मदतीचा पूर्ण उपयोग करून घेण्यांत येत नाहीं, अशी रशिअन तज्ज्ञांची भावना झाली आहे. तिसऱ्या पंचवार्षिक कार्यक्रमासाठी रशिआनें भारताला ४८० कोटी रुपयांची मदत दिलेली आहे. परंतु ह्या रकमेपैकी ३०० कोटी रुपये रकमेचाच उपयोग कार्यक्रमाच्या अखेरीपर्यंत होणार आहे. ह्याचा अर्थ असा कीं, उरलेले १८० कोटी रुपये चौथ्या पंचवार्षिक कार्यक्रमांत वापरावे लागतील. रांची येथें रशिआच्या मदतीनें अवजड इंजिनिअरिंगची यंत्रसामग्री तयार करणारा कारखाना उभारण्यांत आला आहे. ह्या कारखान्याच्या संपूर्ण उत्पादनक्षमतेचा उपयोग करून घेण्यांत येत नाहीं, असें रशिअन तंत्रज्ञांचें म्हणणें आहे. कारखान्याच्या उत्पादनक्षमतेचा पूर्णांशानें उपयोग व्हावा म्हणून सुचविण्यासाठी रशिअन तज्ज्ञ लवकरच भारतांत येणार आहेत. चौथ्या पंचवार्षिक कार्यक्रमांत रांची येथील कारखान्यासारखाच आणखी एक कारखाना पुरविण्यांत यावा अशी विनंती भारतानें केली होती. परंतु दिलेल्या कारखान्याचा अपूर्ण उपयोग होत असतांना नवा कारखाना देण्यास रशिआ नाखुष असल्याची वार्ता आहे. ट्रॅक्टर्स तयार करण्याचा एक कारखाना उभारण्याची विनंतीहि भारतानें केली होती. परंतु खुद्द रशिआलाच अधिकाधिक ट्रॅक्टर्सची गरज असल्यानें ही विनंती मान्य होणें कठीण दिसत आहे. खोल समुद्रांत जाऊन मच्छीमारी करण्याच्या धंद्याला मदत देण्याचें रशिआनें मान्य केलें आहे. ह्या धंद्याचा विकास करण्यासाठी नॉर्वे, जपान ह्या देशांकडूनहि भारत मदत स्वीकारीत आहे.

---

## ही सोन्याची खरेदी कशासाठी ?

लंडनमधील बाजारपेठेंत चीननें मोठ्या प्रमाणावर सोन्याची खरेदी चालविली आहे. ह्या खरेदीची नक्की माहिती अर्थातच बाहेर आलेली नाहीं. एका अंदाजाप्रमाणें गेल्या मार्च व एप्रिल महिन्यांत मिळून चीननें २·२ कोटी पौंड किंमत देऊन ५० टन सोनें विकत घेतलें. त्यानंतरहि अलीकडे आणखी १० टन सोन्याची खरेदी चीननें केली. सोनेबाजारांत चीननें चालविलेल्या ह्या हालचालीमुळें द्रव्यविषयक तज्ज्ञ कांहींसे बुचकळ्यांत पडले आहेत. कारण, सर्वसाधारणपणें चीन हा देश सोन्याची निर्यात करणारा आहे. जागतिक बाजारांतील चीनची व्यापारी देवघेव प्रतिकूल तफावतीची असल्यानें चीन रशिआमार्फत सोन्याची विक्री करीत असतो. १९६१ सालीं चीननें लंडनच्या बाजारांत सोन्याची विक्री करण्याची व्यवस्था केली होती. पण प्रत्यक्ष विक्री मात्र केली नव्हती.

---

## अण्वस्त्रांच्या शोधांतील चीनची प्रगति

चीनचा दुसरा अणुबॉंब स्फोट विमानांतून बॉंब टाकून करण्यांत आला अशी माहिती जपानी वृत्तपत्रांनीं दिली होती. परंतु आतां अशी माहिती मिळाली आहे कीं, चीननें हा स्फोट अग्निबाणाच्या टोंकाला बसविलेल्या अणुबॉंबच्या साह्यानें केला. हें वृत्त खरें असेल तर चीनची अण्वस्त्रें बनविण्याबाबतची प्रगति पाश्चिमात्य शास्त्रज्ञांनीं केलेल्या अंदाजापेक्षा बरीच झपाट्यानें होत आहे असें म्हणावें लागेल. अमेरिकेमधील मॅसेच्युसेटस् तांत्रिक संस्थेंत शिकून तयार झालेला व १९५५ पासून चीनमध्यें परत आलेला एक चिनी प्रोफेसर चीनच्या अण्वस्त्रसंशोधनाचा प्रमुख आहे. अग्निबाणावर बसविलेलीं आण्विक क्षेपणास्त्रें तयार करण्याचा उद्योग चीननें १९५८–५९ सालापासून हातीं घेतलेला आहे.

---

## कच्छच्या सीमेबद्दल निर्वाळा

भारतांत ब्रिटिश राज्य असतांना, सिंधच्या सरकारांत मंत्री असलेले डॉ. हेमनदास वढवानी ह्यांनीं कच्छच्या रणाच्या सीमेबद्दल पत्रक काढलें आहे. १९३७–३८ सालीं ते सिंधच्या सार्वजनिक बांधकाम व आरोग्यखात्याचे मंत्री होते. पत्रकांत ते म्हणतात कीं, कच्छचें रण हें सिंध प्रांतांत कधींच नव्हतें. कंजारकोट व इतर वादग्रस्त ठाणीं हीं संपूर्णपणें सिंध प्रांताच्या भौगोलिक विस्ताराच्या बाहेर होतीं. १९३६ व १९४५ सालीं निवडणुकीसाठी मतदारांच्या ज्या याद्या तयार करण्यांत आल्या त्यांतहि कच्छच्या रणामधील नागरिकांचा समावेश करण्यांत आलेला नव्हता.

## महाराष्ट्रांतील शेतीच्या अर्थशास्त्राचे अभ्यासक जी. कीटिंग यांचें निधन

भूतपूर्व मुंबई प्रांताचे एके काळचे शेतकी खात्याचे संचालक श्रीयुत जी. कीटिंग हे कांहीं महिन्यांपूर्वी इंग्लंडमध्यें वार्धक्यानें मरण पावले हें कळविण्यास आम्हांस वाईट वाटतें. त्या काळच्या इतर सनदी नोकरांपेक्षा श्री. कीटिंग हे फार वेगळे होते. त्यांनीं मुंबई राज्यांतील — विशेषतः महाराष्ट्रांतील — शेतीविषयक प्रश्नांचा सखोल व तौलनिक अभ्यास करून ' पश्चिम भारतांतील शेतीची प्रगति ' आणि ' मुंबई दख्खनमधील ग्रामीण अर्थशास्त्र ' असे दोन उपयुक्त माहितीपूर्ण असे उत्तम ग्रंथ लिहिले आहेत. दख्खनमधील शेतीची दुर्दशा अनेक कारणांमुळें होत असून शेतकऱ्यांना कुटुंब पोसण्यास लागणारी पुरेशी जमीन एके ठिकाणीं नाहीं हें त्यांपैकी एक प्रमुख आहे, असा कीटिंग-साहेबांनीं सिद्धान्त मांडून असें सुचविलें कीं, ४० ते ४५ एकर सलग जमीन, निदान एक भरपूर पाण्याची विहीर आणि शेतावरच राहण्यासाठी घर स्वयंपूर्ण शेतवाडीस आवश्यक आहे.

---

## डॉ. मॅन यांच्या लेखांचा संग्रह

पुणें येथील कृषि महाविद्यालयाचे भूतपूर्व प्राचार्य डॉ. हॅरॉल्ड एच. मॅन ह्यांच्या कांहीं निवडक लिखाणांचा संग्रह प्रसिद्ध होणार आहे. शेतीविषयक क्षेत्रांत संशोधनाचें बहुमोल कार्य डॉ. मॅन यांनीं केलेलें आहे.

दख्खनच्या खेड्यांतील महारांची परिस्थिति ( १९१६ ), दख्खनच्या खेड्याचें अर्थशास्त्र ( १९१६ ), खेड्याचे आर्थिक परिस्थितीवर होणारे भाववाढीचे परिणाम ( १९२० ), १६ व्या शतकांतील भारत ( १९२० ), दख्खन भागांतील पेशवेकालीन खेडें, आदि कितीतरी महत्त्वाचे लेख या संग्रहांत प्रसिद्ध व्हावयाचे आहेत.

---

## स्टॅलिनच्या अमदानींतील भीतीच्या छाया

स्टॅलिनच्या राजवटींतील शिरकाणांच्या अनेक भयानक कथा १९५६ सालीं मि. क्रुश्चॉव्ह ह्यांनीं उजेडांत आणल्या. सुप्रसिद्ध रशिअन लेखक इलया एव्हेनबर्ग ह्यांनी आपल्या आत्मचरित्राच्या शेवटल्या खंडांत आणखी एक कथा कथन केली आहे. पहिल्या महायुद्धानंतर स्थापन झालेल्या राष्ट्रसंघांत, रशिआचे राजदूत म्हणून खिस्तवासी मॅक्झिम लिटव्हिनॉफ ह्यांनीं शांततेसाठी केलेली कामगिरी महशूर आहे. पण ह्या उच्चपदस्थ राजदूतालासुद्धां स्टॅलिनच्या अमलाची छाया भेडसावीत होती. १९३७ सालीं ते रशिआंत परत आले व १९५२ सालीं आजारानें निधन पावले. ह्या कालांत ते आपल्या उशाशीं भरलेलें पिस्तूल ठेवीत असत. गिरफदार होण्याची पाळी आल्यास आत्महत्या करण्याची ही तयारी होती.

---

## १९६४ मधील परदेशी प्रवासी

भारतांत दररोज सरासरीनें ४२८ परदेशी प्रवाशी येतात. १९६३च्या मानानें १९६४ मध्यें ११.२%प्रवासी जास्त आले. एकूण परदेशी प्रवाशांची संख्या १,५६,६७३ भरली. पाकिस्तानांतून भारतांत कांहीं दिवसांपुरते आलेले २,९३,५२० प्रवासी वेगळे. परदेशी प्रवाशांपैकीं ६८.९% अमेरिका, युरोप आणि ऑस्ट्रेलिया येथून आले; ते सर्व येथें बराच खर्च करणारे होते. एकूण प्रवाशांपैकी ६२.३% पुरुष होते, ४०% उतारू ३० ते ५० वर्षें वयाचे होते; २७.८% उतारू ५० वर्षांपेक्षा मोठे होते.


# महाराष्ट्र राज्य सहकारी बँक लि.
## मुंबई
( दि विदर्भ सहकारी बँक लि., सम्मीलित )

| : मुख्य कचेरी : | : विभागीय कचेरी : |
|---|---|
| ९, बेक हाऊस लेन, फोर्ट, मुंबई | महाल : नागपूर. |
| टेलिफोन नं. २५५४७४–७५, | तारेचा पत्ता : |
| २५६२१४ २५४७८१ | फार्मर बँक |

: बृहन्मुंबईतील शाखा :
( १ ) भायखळा ( २ ) गोरेगांव ( ३ ) खार ( ४ ) लालबाग ( ५ ) प्रभादेवी ( ६ ) विलेपार्ले ( ७ ) सांताक्रूझ ( ८ ) मुलुंड ( ९ ) चेंबूर ( १० ) माहीम ( ११ ) शीव ( १२ ) माटुंगा ( १३ ) अंधेरी.

ह्या बँकेंत गुंतविलेला पैका शेतकरी, सहकारी लहान उद्योगधंदे व सहकारी साखर कारखाने यांच्याच उपयोगासाठी दिला जातो.

| | | |
|---|---|---|
| भरपाई झालेलें भांडवल | ... | ५,००,४३,००० |
| गंगाजळी व फंड | ... | १,४४,७४,००० |
| ठेवी | ... | ३०,९०,२५,००० |
| खेळतें भांडवल | ... | ७९,७७,९७,००० |

भारतांतील प्रमुख शहरीं हुंड्या, बिलें वगैरे वसुलीची व्यवस्था केली जाते. सर्व प्रकारच्या ठेवी स्वीकारल्या जातात.

वा. चु. श्रीश्रीमाळ, मॅनेजर.
वि. म. जोगळेकर, जनरल मॅनेजर.



# स्वस्तिकचा माल निर्यात होऊं लागला

—: कांहीं बोलके आंकडे :—

| | |
|---|---|
| १९६३ सालांतील मालाची विक्री | रु. १ कोटी, १ लक्ष |
| १९६३ अखेर वसूल भाग-भांडवल | रु. ४३,८१,४८५ |
| कामगारांची संख्या | १,२०० चे वर |
| कारखान्याच्या बांधलेल्या जागेचें क्षेत्रफळ | १,२०,००० चौ. फू. |

— प्रमुख उत्पादनें —

गमबूट्स—होजपाईप्स—प्रेशर होजेस
ग्लोव्हज—इरेझर्स—ऑईल सील्स
व
स्वरूपं केबल्स



## स्वस्तिक रबर प्रॉडक्ट्स लि.
स्वस्तिक गृह, खडकी, पुणें ३.
( टेलिफोन नं. : ५५२०१ )

## जाहिरातींवरील खर्च

### गैरव्यवहारांना आळा घालण्याचा निर्बुद्ध प्रयत्न

भारतांतील औद्योगिक आणि व्यापारी कंपन्यांतर्फे जाहिरात खातीं केल्या जाणाऱ्या खर्चांवर बंधनें घालण्याचा अधिकार सरकारनें प्राप्तिकरांत दुरुस्ती सुचवून स्वत:कडे घेण्याचा केलेला प्रयत्न सध्यां तरी लांबणीवर पडला आहे. १९६४ सालांतील फायनान्स बिलाच्या ९ व्या कलमानें १९६१ सालच्या प्राप्तिकराच्या ३७ व्या कलमांत अशा तऱ्हेची दुरुस्ती सुचवून हा अधिकार दि. १ एप्रिल १९६५ पासून स्वत:कडे घेण्याचें भारत सरकारनें ठरविलें होतें. परंतु फेडरेशन ऑफ इंडियन चेंबर्स ऑफ कॉमर्स अँण्ड इंडस्ट्रीज तसेंच निरनिराळीं चेंबर्स, वृत्तपत्रें, ॲडव्हर्टाइझिंग एजन्सीज्, त्यांची प्रातिनिधिक संस्था आणि उद्योगपति ह्यांनीं जोरदार विरोध केल्यानें हें बिल तूर्त तरी लांबणीवर टाकण्याचा निर्णय आपल्या सरकारला घ्यावा लागला आहे. ' जर हा कायदा अमलांत येणार असेल तर एक एप्रिल-पासून आमच्या वृत्तपत्रांतून एकहि जाहिरात आम्ही छापणार नाहीं ' अशी वृत्तपत्रांनीं दिलेली धमकीहि बऱ्याच अंशीं यशस्वी ठरली यांत शंका नाहीं.

### मंत्र्यांच्या पाठीमागें तयार झालेले नियम

" १९६२ सालच्या चीनच्या आक्रमणानें जेवढा धक्का दिला नसेल तेवढा धक्का अर्थमंत्रालयांतील ' पांच विद्वानां 'नीं, आपल्या बारा महिन्यांच्या अभ्यासानंतर तयार केलेल्या ह्या विधेयकानें दिला आहे " अशी टीका भारतांतील एका प्रमुख व्यापारी मासिकानें केली आहे. सदरहू मासिक पुढें म्हणतें, " सर्वांत आश्चर्याची गोष्ट अशी कीं हें विधेयक गॅझेटमध्यें प्रसिद्ध होई-पर्यंत खुद्द अर्थमंत्र्यांना त्याचा पत्ताहि नव्हता ! तेव्हां परराष्ट्र व्यापार, उद्योगधंद्याचें मंत्रालय किंवा लोकसभेच्या सभागृहाला जर ह्याविषयीं कांहींच माहिती नसली तर त्यांत नवल तें काय ? प्रस्तुत विधेयक जर अमलांत आलें असतें, तर जाहिरातीसाठी करण्यांत यावयाचा खर्च आणि वार्षिक उलाढाल ह्यांचा मेळ खालील कोष्टकांत दाखविल्याप्रमाणें बसवावा लागला असता :

| कंपनीची वार्षिक उलाढाल | जाहिरातीसाठी खर्च करायाच्या रकमेची मर्यादा | प्राप्तिकरांतून वगळण्यासाठी दाखवावयाच्या रकमा |
|---|---|---|
| पहिल्या २५ लाख रु. पर्यंत : | २% | रु. ५०,०००/– |
| नंतर २५ लाखांवर : | १% | " २५,०००/– |
| " २५ " " | ½% | " १२,५००/– |
| " २५ " " | ½% | " १२,५००/– |

म्हणजेच पहिल्या १ कोटि रुपयांच्या उलाढालीवर एक लक्ष रुपयांपर्यंत जाहिरातींवर खर्च करतां येईल.

दोन किंवा अधिक कोटींच्या उलाढालीवर खालील रक्कम प्राप्तिकरांतून वगळतां येईल.

| कंपनीची वार्षिक उलाढाल | प्राप्तिकरांतून वगळण्यासाठी दाखवावयाच्या रकमा |
|---|---|
| २ कोटि रुपयांवर : | रु. १,२५,००० |
| ३ " " | " १,५०,००० |
| ५ " " | " २,००,००० |
| १० " " | " ३,२५,००० |
| २० " " | " ५,७५,००० |
| २५ " " | " ७,००,००० |
| ५० " " | " १३,२५,००० |
| १०० " " | " २५,७५,००० |

### न सुटणारें गणित

आपल्या मालाचा अधिक उठाव व्हावा, त्याची लोकप्रियता वाढावी, आणि आपला व्यापार वाढावा हेंच एकमेव उद्दिष्ट जाहिरात देण्यापाठीमागें असतें. वरील निर्बंधामुळें जर ५ लाख ७५ हजार जाहिरातींवर खर्च करावयाचा असेल—आणि बहुतेक बड्या व्यापारी कंपन्यांच्या आवाक्यांतील ही रक्कम आहे—तर तुम्हीं २० कोटि रुपयांची उलाढाल केली पाहिजे ! बुद्धीला न पटणारें आणि कोणत्याहि राज्यशासनाला कधींहि सांगड न घालतां येणारें असें हें गणित आहे. वीस कोटींपेक्षा जास्त उलाढाल असलेल्या फारच थोड्या कंपन्या भारतांत अस्तित्वांत आहेत, आणि अशा कंपन्या जाहिरातींच्या मागें विशेषें करून लागत नाहींत, ह्याची जाणीव आपल्या सरकारला आहे असें वाटत नाहीं. ह्यापेक्षा अधिक हास्यास्पद गोष्ट म्हणजे ' जाहि-रातींवरील खर्च ' ह्या सदरांत नुसतींच जाहिरातींचीं बिलें समाविष्ट नसून राहावयाच्या जागेचें भाडें, कंपन्यांच्या डायरे-क्टर्स आणि पाहुणेमंडळींसाठी असलेलीं गेस्ट हाऊसेस, कंपनीच्या नोकरांचा प्रवास-भत्ता इत्यादींचा समावेश करण्यांत आला आहे !

### परिणामांचा विचार नाहीं

' हें विधेयक आणण्याचें प्रयोजन काय ? ' ह्या प्रश्नाचें सरकारी उत्तर ठोकळमानानें असें देण्यांत आलें आहे कीं, ह्या सवलतींचा फायदा घेऊन कंपन्यांतर्फे प्राप्तिकर बऱ्याच प्रमाणांत चुकविला जातो. ज्याचा मालाच्या जाहिरातीशीं कांहींहि संबंध नाहीं, अशा खर्चांचीं बिलें ' जाहिरात खातीं ' दाखविलीं जातात, आणि सरकार त्यांवरील प्राप्तिकराला मुकतें, असा सरकारचा दावा आहे. हा दावा किती खोटा आहे, हें ' एकॉ-नॉमिक टाईम्स 'नें स्पष्टपणें दाखवून दिलें आहे. दि. २५ मार्च-च्या आपल्या अंकांत त्यांनीं जाहिरात करणाऱ्या १११ कंपन्यांच्या खर्चाचा एक तक्ता दिला आहे. आणि त्यांतील ८२ कंपन्या ह्या विधेयकान्वयें मिळणाऱ्या सवलतीपेक्षा बराच कमी खर्च करतात असें दाखवून दिलें आहे. ह्याचाच अर्थ असा कीं, ज्या ठिकाणीं व्यापारी स्पर्धा नाहीं, म्हणजेच जेथें ' सेलर्स मार्केट ' आहे, तेथें जाहिरातबाजीवर खर्च केलाच जात नाहीं ! आणि ह्यावरून निष्कर्ष निघतो तो असा कीं, व्यापारी कंपन्या अशाच वेळीं जाहिरातींवर खर्च करतात, कीं ज्या वेळीं तो अत्या-वश्यक असतो ! जाहिरात केल्याविना गत्यंतर नाहीं, असें दिसतें तेव्हांच जाहिरातींवरील खर्च वाढविण्यांत येतो. जर सरकारनें हें विधेयक अमलांत आणण्याचें ठरविलें असतें, तर वार्षिक उलाढाल कमी म्हणून जाहिरातींवरील खर्च कमी आणि जाहिरात कमी म्हणून मालाला उठाव कमी, अशी चमत्कारिक परिस्थिति निर्माण झाली असती. ह्याचा परिणाम असा झाला असता कीं, अनेक लहान-लहान व्यापारी मंडळींना आपल्या संस्थांना टाळीं ठोकावीं लागलीं असतीं, वृत्तपत्रांचें उत्पन्न कमी होऊन त्यांनाहि प्रकाशन बंद करणें भाग पडलें असतें. शिवाय हजारों कामगार, नोकरवर्ग, कारकून वगैरे बेकार झाले असते तें निराळेंच. पंचवार्षिक योजनांद्वारां औद्योगिक विकास साधून बेकारी नष्ट करण्याचे प्रयत्न एका दिशेनें चालू असतां दुसरी-कडे अशा तऱ्हेनें बेकारी वाढविणारें विधेयक लोकसभेला सादर करण्यांत आलें होतें—ह्यांत खरीखुरी सरकारी इच्छा काय तें कळत नाहीं.

### आवश्यक व समर्थनीय

जाहिरातींवरील खर्चाची कंपनीच्या उलाढालीशीं

सांगड घालणें सर्वथा असमर्थनीय आहे; कारण त्यामुळें लहान व्यापाऱ्यांना वा नव्या मालाच्या उत्पादकांना आपल्या व्यवसायाची वाढ करणें अशक्य होऊन बसेल. नवे नवे उद्योग आपल्या देशांत प्रत्यहीं सुरू होत आहेत; असलेल्यांचा विस्तार होत आहे. त्यांना आपलें उत्पादन बाजारांत खपविण्यासाठी, आपला ग्राहकवर्ग तयार करण्यासाठी जाहिरातीवर विशेष भर देणें क्रमप्राप्त आहे. वर्षातील उलाढालीचा फार मोठा भाग अशा वेळीं जाहिरातीवर खर्च होणें अगदीं शक्य आहे आणि तो खर्च सर्वस्वीं समर्थनीय आहे. नव्या मालाच्या बाबतींतच हा प्रश्न उपस्थित होईल असें नाहीं. एखाद्या कंपनीचा माल बाजारांत स्थिरावलेला असतो. अशा वेळीं दुसरी एखादी कंपनी तोच माल आकर्षक स्वरूपांत बाजारांत आणते. ह्या नव्या स्पर्धकाला तोंड देऊन आपलें स्थान टिकवून धरण्यासाठी प्रस्थापित कंपनीलाहि जाहिरातीची मोहीम आंखावी लागेल. हा खर्च सरकारच्या टकेवारींत बसूं शकत नसला तरी तो पूर्णतः आवश्यक व समर्थनीय असतो. सरकारला ह्या गोष्टी दुर्लक्षिता येणार नाहींत.

### गैरव्यवहार थांबतील ?

हें विधेयक आणण्याचें दुसरें कारण म्हणजे जाहिरातीच्या नांवाखालीं जे अनेक गैरव्यवहार चालू आहेत, त्यांना आळा घालावा असेंहि असूं शकेल. साधारणतः एक वर्षापूर्वी लोकसभेंत भाषण करतांना अर्थमंत्री नामदार टी. टी. कृष्णम्माचारी यांनीं असें म्हटलें होतें कीं, "हल्लीं जाहिराती आणि प्रवासखर्च ह्यांपोटीं होणारा खर्च बराच वाढत चालल्याचें सरकारच्या नजरेस आलें असून, त्याला आळा घालण्यासाठी मी त्यांत जास्त लक्ष घालणार आहें." या घोषणेच्या अनुषंगानें सरकारच्या खजिन्यांतून कांहींतरी बाहेर येणार ही कल्पना जरी असली, तरी असलें 'रत्न' बाहेर येईल अशी अपेक्षा नव्हती. एकंदर विधेयक नीटपणें तपासूनहि अप-प्रवृत्तींना गंभीरपणें आळा बसेल-अर्थात् व्यापाऱ्यांवर अनावश्यक आणि हानिकारक निर्बंध न घालतां-अशी कोणतीहि सूचना यांत अंतर्भूत नाहीं !

शेवटीं एक एप्रिल उजाडण्यापूर्वीच सरकारतर्फे हें विधेयक मागें घेतल्याचें जाहीर करण्यांत आलें. आणि २४ एप्रिलपर्यंत सर्व संबंधितांनीं सरकारकडे लेखी निवेदनें पाठवावींत असें घोषित करण्यांत आलें. अशा तऱ्हेनें आलेल्या सर्व सूचनांचा सर्वतोपरी नीट विचार करण्याचें आश्वासनहि अर्थमंत्र्यांनीं दिलें आहे. जरी अनेक व्यापारी संस्थांनीं, अॅडव्हर्टायझिंग एजन्सीजनीं आणि चेंबर्सतर्फे अशीं निवेदनें सादर करण्यांत आलीं असलीं तरी २४ दिवसांची मुदत ही अपुरी आहे, ह्या बाबतींत सर्वांचें एक मत आहे. सर्व विचारप्रवाह जाणून घेण्यासाठी पुरेशी मुदत देणें अत्यावश्यक होतें.

अनेक सूचना ह्या संदर्भांत करण्यांत आल्या आहेत. त्यांपैकी महत्त्वाची म्हणजे हें बिल तपासणीसाठी लोकसभा-सदस्यांच्या एका खास समितीकडे धाडण्यांत यावें. ह्या समितीवर सर्व संबंधित व्यक्ति आणि संस्थांचे प्रतिनिधि घ्यावेत, आणि सर्वांच्या विचारानें हें विधेयक नव्यानें सादर करावें. 'सेंट्रल बोर्ड ऑफ डायरेक्ट टॅक्सीस' ह्या अर्थखात्याच्या नियंत्रणाखालीं असलेल्या समितीनें हें काम करूं नये. ही सूचना फार महत्त्वाची आणि म्हणूनच विचारांत घेण्यासारखी आहे. सर्वांना मान्य असें विधेयक जर यावयाचें असेल, तर अशाच कमिटीतर्फे होणाऱ्या विचारमंथनांतून तें बाहेर येण्यासारखें आहे. दुसऱ्या एका सूचनेनुसार वार्षिक उलाढाल आणि जाहिरातींवर खर्च करावयाची रक्कम ह्यांच्या प्रमाणांत आमूलाग्र बदल व्हावयास पाहिजे. जाहिरातींचा खर्च वार्षिक उलाढालीवर अवलंबून नसून तो बाजारांतील स्थिरस्थिरता आणि मालाला असलेली मागणी, त्यासाठी होणारी स्पर्धा इत्यादि अनेक गोष्टींवर अवलंबून असतो. डायरेक्टर्स आणि नोकरवर्ग ह्यांच्यासाठी असलेलीं वसतिगृहें आणि प्रवासखर्च ह्या विधेयकांतून अजिबात वगळावा अशीहि एक मागणी आहे. व्यापारी संस्थांचें सहकार्य-जें औद्योगिक प्रगतीसाठी आवश्यक आहे-जर सरकारला हवें असेल तर लहानसहान व्यापाऱ्यांना मारणारें आणि हजारों कामगारांना बेकार करणारें हें विधेयक सरकारनें कायमचें मागें घ्यावें अशी विनंतीहि एका सूचनेद्वारें सरकारला करण्यांत आली आहे.

— अच्युत गाडगीळ, "वैभव", मे, १९६५

---

**चीनचा दुसरा अणुबॉम्ब**—चीनने स्वतः बनविलेल्या दुसऱ्या अणुबॉम्बच्या स्फोटानंतर त्याच्या शक्तीविषयीं पाश्चिमात्य देशांतील शास्त्रीय जगांत अंदाज व्यक्त करण्यांत येत आहेत. स्टॉकहोम येथील अपसाला निरीक्षण केंद्रानें असा अभिप्राय व्यक्त केला आहे कीं, चीनचा दुसरा अणुबॉम्ब पहिल्या अणुबॉम्बपेक्षां निदान तिप्पट शक्तीचा असावा. गेल्या ऑक्टोबर मध्यें स्फोट करण्यांत आलेल्या चिनी अणुबॉम्बची शक्ति २० किलोटन परिमाणाची होती.

**वर्णद्वेषाविरुद्ध शिक्षा**—जागतिक आरोग्य संघटनेनें आपल्या घटनेंत दुरुस्ती करून वर्णभेदावर आधारलेली वागणूक करणाऱ्या देशाचें सभासदत्व स्थगित करण्याचा अगर रद्द करण्याचा अधिकार स्वतःस देणारी घटना-दुरुस्ती मंजूर केली. दुरुस्तीचा अंमल होण्यापूर्वी संघटनेच्या सभासदांपैकी दोनतृतीयांश सभासदांनीं ती मान्य केली पाहिजे. घटना-दुरुस्तीस ब्रिटन, अमेरिका आणि पश्चिम युरोपांतील देश ह्यांनीं विरोध केला.

**कापडधंद्याला जपानची मदत**—हिंदमधील कापसाच्या कापडधंद्यांतील यांत्रिक साहित्याचें आधुनिकीकरण करण्यासाठी जपाननें १ कोटी डॉलर्सचें कर्ज देऊं केलें आहे. ह्यापूर्वी भारत मदत मंडळामार्फत जपाननें भारताला ६ कोटी डॉलर्सचें कर्ज दिलेलें आहे. हिंदी कापड कारखानदार आणि जपानी यंत्र कारखानदार ह्यांच्या दरम्यान झालेल्या कराराप्रमाणें नवीन कर्ज देण्यांत आलें आहे. कर्जाबाबतच्या वाटाघाटी मात्र सरकारी पातळीवर झाल्या.

**विजेवर चालणारीं रेल्वे एंजिनें**—भारताच्या रेल्वे खात्यानें जपानकडे आणखी दोन विजेच्या रेल्वे एंजिनांची मागणी नोंदविली आहे. ह्या रेल्वे एंजिनांसाठीं १२ कोटी येन अथवा सुमारें १६ लाख रुपये द्यावे लागतील. गेल्या मार्च महिन्यांत भारतातर्फे १८ विजेच्या एंजिनांची पहिली मागणी नोंदविण्यांत आली आहे.

**आधुनिक पद्धतीची भातगिरणी**—आंध्र प्रदेशांतील गोदावरी जिल्ह्यांत आधुनिक पद्धतीची भात सडण्याची गिरणी उभारण्यांत येणार आहे. ह्या जिल्ह्यांत भाताचें पीक चांगलें येतें. गिरणीच्या उभारणीसाठी २२ लाख रुपये लागणार आहेत. गिरणीसाठी जपानी यंत्रसामग्री मागविण्यांत आली आहे. ती आणखी तीन महिन्यांनीं चालूं होईल.

## अमेरिकेंतील विवाहित स्त्रिया व नोकऱ्या

१९६० नंतरच्या काळाचा आढावा घेतां असें आढळून आलें आहे, कीं पूर्वीच्या कोणत्याहि कालखंडापेक्षा चालू काळांत अधिक अमेरिकन विवाहित स्त्रिया नोकरी करीत आहेत.

गेल्या पंधरा वर्षांत निरनिराळ्या क्षेत्रांत ज्या नोकऱ्या उपलब्ध झाल्या, त्यांपैकीं ५० टक्के नोकऱ्या स्त्रियांनीं घेतल्या. आज अमेरिकेंत १ कोटि, ४५ लक्ष विवाहित स्त्रिया नोकरी करीत आहेत. अमेरिकेंत नोकरी करणाऱ्या एकंदर लोकांपैकीं २० टक्के या विवाहित स्त्रिया आहेत. १९५० सालीं दर सातांपैकीं सुमारें एकजण ही विवाहित स्त्री होती.

### नोकरीचीं क्षेत्रें

१९५० ते १९६५ या कालांत नोकरी करणाऱ्या विवाहित स्त्रियांच्या संख्येंत फार मोठ्या प्रमाणावर वाढ झाली. त्यांत ४५ ते ६४ या वर्षांच्या दरम्यानच्या स्त्रियांचें प्रमाण विशेष आहे. अमेरिकन लोकांची आयुर्मर्यादा वाढल्यानें या वयाच्या अधिक स्त्रिया नोकरींत दिसत आहेत. तसेंच नोकऱ्या शोधणाऱ्या उतार वयाच्या स्त्रियांचें प्रमाण पंधरा वर्षांपूर्वीच्या मानानें दुप्पट झालें आहे. १९ व्या शतकांत, सर्वसाधारण स्त्रीला ४५ वर्षे पूर्ण झालीं म्हणजे आपलें सरासरी आयुर्मान संपत आलें असें वाटत असे. पण आतां मात्र ४५ व्या वर्षी ती नवी नोकरी स्वीकारण्यास तयार असते.

ज्या स्त्रियांना लहान मुलें आहेत, अशा स्त्रिया पूर्वीं नोकरी करण्यास फारशा जात नसत. पण आतां मुलें सांभाळण्याची व्यवस्था झाल्यामुळें अशा स्त्रियांचें प्रमाण बरेंच वाढलें आहे. ज्यांना सहा वर्षांखालील मुलें आहेत, अशा ६० लक्ष विवाहित स्त्रिया सध्यां अमेरिकेंत काम करीत आहेत.

### सुशिक्षित स्त्रिया

नोकऱ्या करणारांत सुशिक्षित स्त्रियांचें प्रमाण फार मोठें आहे. स्त्री जितकी अधिक शिकलेली असेल, तितकी ती नोकरी धरण्याचा संभवहि अधिक असतो.

"तुम्ही नोकरी कां करतां?" असा प्रश्न विचारला असतां "आर्थिक कारणासाठीं" असें उत्तर बहुतेक स्त्रिया देतात. एखाद्या कुटुंबांत लहान मुलें" असलीं तर व पतीचें उत्पन्न सर्वांना खर्च भागविण्यास पुरें पडत नसेल, तर स्त्रिया नोकरी करतात. संपन्न समाजांत पुरुषाचें उत्पन्न भरपूर असतांनाहि स्त्रिया नोकरी कां करतात, असा प्रश्न साहजिकच उपस्थित होतो. याचें उत्तर असें, कीं वाढतें शिक्षण व जीवनमानांत झालेल्या सुधारणा यामुळें 'गरजां' विषयींच्या अमेरिकनांच्या कल्पनाहि बदलल्या आहेत.


### विज्ञानाचा फायदा

अमेरिकन स्त्रिया कामावर जातात याचें आणखीहि एक कारण आहे. पूर्वीच्या काळीं घरकाम हें गृहिणीला स्वतःलाच करावें लागे व त्यांतच तिचा सबंध दिवस जात असे. पण आतां विज्ञान व उद्योगशास्त्र यांच्या प्रगतीमुळें घरकाम सुलभ करणारीं शेंकडों यंत्रें व उपकरणें निघालीं असून त्यांच्या साहाय्यानें स्त्रियांना आपलीं कामें जलद आटोपतां येतात. अर्थातच तिला भरपूर फावला वेळ मिळतो. त्यांत ती नोकरी करते आणि आपलें जीवनमान सुधारते.

अमेरिकेंतील सर्व स्त्रियांचें वार्षिक उत्पन्न सुमारें ३५ अब्ज डॉलर आहे. प्रत्येकीचें सरासरी उत्पन्न वार्षिक १,५०० डॉलर पडतें. म्हणजे कुटुंबाच्या एकंदर उत्पन्नाच्या २० टक्के ही स्त्रियांची मिळकत असते. सबंध वेळ काम करणारी स्त्री वार्षिक ३,५०० डॉलरपर्यंत मिळविते.

सरदारगृह
मुंबईंत राहण्याची व भोजनाची उत्तम सोय.
मंगलकार्ये व मेजवान्या यांसाठीं सोईस्कर ठिकाण.
— आमचीं वैशिष्ट्यें —
* हीरकोत्सवानिमित्त अद्ययावत् पद्धतीचें भोजनगृह व अनेक प्रकारच्या सुखसोयी.
* टिळक जन्म-शताब्दीदिनीं लोकमान्यांचें सरदारगृहांत केलेलें स्मारक.
फोन नं. :–३८३३७] सरदारगृह प्रा. लि. [ तार–सरदारगृह
क्रॉफर्ड मार्केटजवळ, मुंबई २.

भारतातील प्रमुख नागरी सहकारी बँक!
सारस्वत
को-ऑपरेटिव्ह बँक लि.
सारस्वत बँक बिल्डिंग, गिरगांव, मुंबई ४.
वसूल भांडवल ... रु. १० लाख
रिझर्व्ह व इतर फंडस् ... रु. १५ ,,
ठेवी ... रु. ३३८ ,,
खेळतें भांडवल ... रु. ४५३ ,,
शाखा : फोर्ट, दादर, माहीम, वरळी, वडाळा, पुणें व बेळगांव. महिला शाखा : सारस्वत बँक-गृह, निकदवरी लेन, मुंबई ४.
स्थापना १९१८

महाराष्ट्र सरकारनें तगाईवर मंजूर केलेले
"विजय" नांगर
वापरा. ४, ६ व ८ बैली
फाळ व सुटे भाग

तसेंच विजय सेंट्रिफ्युगल पंप्स्


१" ते ४" बेल्ट ड्राइव्ह व डायरेक्ट कपल्ड, शिवाय
बोअरिंगचे हँड पंप्स्, हँड रहाट इ. इ.
— न्यू विजय इंडस्ट्रीज लि. —
विश्रामबाग – सांगली (महाराष्ट्र)

## वास्तुशास्त्र

लेखक : सौ. नीलम् मंत्री, बी. ए., बी. कॉम्.

'वास्तुशास्त्राला बांधकामाची कला किंवा बांधकामाचें शास्त्र, असें म्हणतां येईल. या बांधकामांत घरें, शाळा, देवळें, इस्पितळें, करमणुकगृहें, कचेऱ्या, इत्यादींचा समावेश होतो. थोडक्यांत म्हणजे, 'नागरी राहणीसाठीं प्रामुख्यानें केलें जाणारें बांधकाम या सदरांत येतें.' (वेब्स्टर). व्हिट्रुव्हिअसनें बांधकामाच्या उद्देशांत 'सोय, सौंदर्य व भक्कमपणा' यांचा उल्लेख केला आहे तर वास्तुशास्त्राच्या आपल्या व्याख्येंत एच्. डब्ल्यू. कॉर्बेट म्हणतो, 'सौंदर्य आणि उपयुक्तता यांचा मिलाफ म्हणजे बांधकामाची कला. जागेचा जास्तींत जास्त चांगला उपयोग माणसांच्या राहण्यासाठीं कसा करतां येईल हा या कलेपुढील प्रश्न आहे. बांधकामांत सौंदर्य, भव्यता, एकात्मता व जोरकसपणा निर्माण करतांना सोयींकडे दुर्लक्ष होतां कामा नये.' सौंदर्यदृष्टीशिवाय केलेल्या बांधकामाहून वास्तुशास्त्राचें वेगळेंपण हें असें प्रकर्षानें जाणवतें.

या शास्त्रांत इतरहि कांहीं कलांचा समावेश होतो किंवा त्यांना योग्य अशी पार्श्वभूमि निर्माण केली जाते. उदा. शिल्पकला, सुतारकाम, गृह–सजावट, वगैरे. म्हणून 'संयुक्त कला' (कंबाइंड आर्ट) असेंहि त्यास कधींकधीं म्हटलें जातें. तर्कशुद्धपणें उपयोग केल्यास, माणसाच्या गरजा व त्याच्या आकांक्षा यांचें प्रतिबिंब त्यांत दिसूं शकतें. वास्तुशास्त्राचा ठसा माणसांवर मुख्यत्वें नेत्रद्वारां उमटत असल्यामुळें 'व्हिज्युअल आर्ट' हें नांव त्यास मिळालें आहे. वास्तुशास्त्राच्या मुख्य पाश्चिमात्य शैलींत ग्रीक, इजिप्शियन, रोमन, बायझंटाईन, रोमॅनेस्क, गोथिक, रेनेसान्स, बरूक व रोकोको यांचा समावेश होतो. भारतीय संस्कृतींतहि कांहीं वैशिष्ट्यपूर्ण शैली निर्माण झाल्या आहेत; उदा. चालुक्य, द्राविडी, इस्लामी, हिंदु, बौद्ध, वगैरे.

नगर–रचना (टाउन प्लॅनिंग) व लँडस्केप आर्किटेक्चर यांच्याशीं वास्तुशास्त्राचें सहकारित्वाचें नातें आहे. जमिनीच्या एखाद्या तुकड्याची नैसर्गिक पार्श्वभूमि लक्षांत घेऊन तिला उठाव येईल अशा रीतीनें तिची रचना अथवा पुनर्रचना करणें हें लँडस्केप आर्किटेक्चरमध्यें मोडतें. मात्र सौंदर्यदृष्ट्या ही रचना करतांना पुढें तिचा कोणता उपयोग होणार आहे हें लक्षांत घ्यावें लागतें. नगर–रचनेमध्यें शहरांतील रस्ते, उद्यानें, करमणुकीचीं स्थळें, उद्योगधंद्यांचीं केंद्रें, इत्यादींची पद्धतशीरपणें आंखणी केली जाते. ही करतांना आरोग्य, सोय व सौंदर्य यांकडे लक्ष पुरविलें जातें.

नजरेस आल्हाददायक वाटणाऱ्या व ज्या उपयोगांसाठी त्या बांधल्या जातात त्यासाठी योग्य अशा इमारतींचे प्रथम नकाशे करणें व त्यांच्या उभारणीवर देखरेख करणें हें वास्तुशास्त्रांत मोडतें. इमारती या त्रिमितियुक्त (थ्री डायमेन्शनल) असून माणसांच्या किंवा जनावरांच्या वावराला पुरेशी जागा त्यांत पूर्णपणें किंवा कांहीं अंशीं बंदिस्त केली जाते. दर्शनी भाग, आंतील भाग किंवा पिछाडीचा भाग यांच्या सौंदर्याचा सारखाच विचार केला जातो. बांधकामाची साधारण वर्गवारी त्याच्या केल्या जाणाऱ्या उपयोगावरून व तदनुसारच्या त्याच्या घाटणीवरून पुढीलप्रमाणें करतां येईल—घरें (यात सर्वसाधारण घरें, राजवाडे, मुख्यत्वें पाश्चात्त्य देशांत आढळणारीं अपार्टमेंट हाऊसीस् व राहण्यासाठींच उपयोगांत येणारीं हॉटेल्स या सर्वांचा समावेश होतो.), देवळें, चर्च, मठ, शाळा, इस्पितळें, किल्ले, धरणें, पूल, थिएटर्स, अँफीथिएटर्स, दीपस्तंभ, सार्वजनिक स्नानगृहें, स्तंभ, वाचनालयें, दुकानें, कचेऱ्या, गुदामें, रेल्वे स्टेशन्स् व विमानतळ.

इमारत म्हणून ओळखलें जाणारें बांधकाम कायम राहावें अशा तऱ्हेनें जमिनीच्या कांहीं भागावर उभारलेलें असतें. या बांधकामासाठीं लागणाऱ्या वस्तूंची यादी खूपच मोठी आहे. परंतु प्रामुख्यानें लांकूड, विटा, दगड, चुना, सिमेंट, रेती, लाव्हा, पोलाद, काँक्रीट, कांच इत्यादींचा उपयोग केला जातो.

वास्तुशिल्पज्ञ (आर्किटेक्ट) हा बांधकामांत पारंगत असावा लागतो. इमारतींचे नकाशे तयार करणें, कुठल्या वस्तूंचा कशा प्रकारें उपयोग करावा त्याचा आराखडा करून वस्तूंची किंमत त्यावरून ठरवणें व बांधकामावर देखरेख करणें, हा त्याचा व्यवसाय असतो.

प्रथम बरींचशीं स्केचेस् काढून, त्यांचा अभ्यास करून पसंत किंवा नापसंत केलीं जातात. पर्स्पेक्टिव्ह ड्रॉइंग्ज् व अभ्यसनीय अशा छोट्या प्रतिकृति बनविल्या जातात. त्यानंतर त्यावरून प्रत्यक्षांत उतरविलें जाणारें त्या इमारतीचे जमिनीवरले नकाशे, दर्शनी भागाचे नकाशे, विच्छेदन स्वरूपांतील (सेक्शन्स) नकाशे, बांधकामाच्या मोजमापाचे नकाशे, वगैरे बनविले जातात. हे नकाशे बनविले जात असतांनाच इमारतीच्या मजबुतीचाहि विचार केला जातो. त्यासाठी त्या क्षेत्रांतील खास तज्ज्ञ इंजिनिअर्सची मदत घेतली जाते. हें सर्व झाल्यानंतर नगरपालिकेच्या परवानगीनुसार प्रत्यक्ष बांधकामास सुरुवात होते व देखरेख करण्याचें काम वास्तुशिल्पज्ञाला करावें लागतें. त्यासाठी समतोल विचार, निष्पक्षपातीपणा व तांत्रिक जाणकारी, हे गुण त्याच्या अंगीं असावे लागतात.

चार्ल्स् कोल यानें म्हटल्याप्रमाणें 'वास्तुशिल्पज्ञ हा कलावंत असून जाणकार धंदेवाईक व व्यवसायी असावा लागतो.' मात्र त्याच्या दृष्टीनें धंदा हें साध्य नसून केवळ साधन असतें.

---

### भारतांत डॉक्टरांचा व नर्सेसचा तुटवडा

भारतांत प्रत्येक १० लक्ष लोकसंख्येस १९७ डॉक्टर आहेत; प. जर्मनींत त्यांची संख्या २,०९३ असून रशियांत २,०७२, अमेरिकेत १,८३१, इटलींत १,६२७, रुमेनिआंत १,४८२, जपानमध्यें १,४१४, कॅनडांत १,४००, फ्रान्समध्यें १,३८९, पोलंडमध्यें १,२४२ आणि स्पेनमध्यें १,०७९ आहेत. हे आकडे पांच वर्षांपूर्वींचे आहेत आणि गेल्या पांच वर्षांत प्रगति झाली असली, तरी भारत आणि इतर देश ह्यांच्यांतील तफावत कायमच आहे. मिलिटरी नर्सिंग सर्व्हिसमधील नर्सेसच्या मंजूर १६८० जागांपैकी ४६२ जागा अद्याप रिकाम्या आहेत, ह्यावरून नर्सेसच्या तुटवड्याची कल्पना येईल. प्रत्येक २५,००० लोकसंख्येस एक नर्स असें भारतांत प्रमाण पडतें; अमेरिकेंत प्रत्येक ३५० जणांमागें एक नर्स आहे.

---

**जपानची मदत**—कांहीं विशिष्ट प्रकारचें पोलाद निर्माण करणाऱ्या कारखान्याच्या उभारणीचे कामीं जपानमधील कोबे पोलाद कंपनी टाटा आयर्न अँड स्टील कंपनीला मदत देणार आहे. संकल्पित कारखाना जमशेटपूर येथें उभारण्यांत यावयाचा आहे. कारखान्यांत दरसाल ४० ते ५० हजार टन पोलाद निर्माण करण्यांत येईल. त्याच्या उभारणीसाठी १,५०० कोटी येन अथवा २० कोटी रुपये खर्च येईल.

### हिंदी रिस्ट वॉचेसची निर्यात होणार

दि हिंदुस्थान मशीन टूल्स लि. चा घड्याळांचा कारखाना, उत्पादन सुधारल्यावर, दरसाल एक लक्ष घड्याळें निर्गत करूं शकेल. प्रत्येक घड्याळाची निर्गतीची किंमत अंदाजें ५० रु. राहील. हेअर स्प्रिंग्ज, कृत्रिम ज्युवेल्स, इत्यादि १५% सुट्या भागांची आयात करावी लागते, त्याची किंमत भागविण्यास ही निर्गत उपयोगी पडेल. १९६६ चे सुमारास वार्षिक उत्पादन ५ लक्ष घड्याळें होऊं लागेल. सध्यां ह्या घड्याळांच्या किंमती खालीलप्रमाणें आहेत:—रोल्ड गोल्ड: १०५ रु., स्टेनलेस स्टील: ९९ रु. आणि १०६ रु., सुजाता (लेडीज) ११० रु.

---

### पाकिस्तानी तरुणींची हेरगिरीसाठी नेमणूक

पंजाबच्या सरहद्दीवरील प्रदेशांत प्रवेश मिळवून कित्येक पाकिस्तानी मुली हेरगिरी करीत आहेत. खेडेगांवांतील स्त्रियांप्रमाणें पोशाख करून गवत कापणाऱ्या अशा दोघा मुलींची झडती घेतली, तेव्हां त्यांचेजवळ सुसज्ज पिस्तुलें आढळलीं. त्या उत्कृष्ट इंग्रजी बोलल्या. अशा तऱ्हेनें पंजाबांतील कित्येक गांवांतून पाकिस्तानी हेर काम करीत असल्याचें त्यांनीं सांगितलें. देखण्या, सुशिक्षित मुलींना हेरगिरीसाठी नेमण्याचें पाकिस्तान सरकारचें धोरणच आहे.

---

### हातमागाच्या कापडाचा सांठा

मद्रास राज्यांतील प्राथमिक आणि मध्यवर्ती विणकर सहकारी संघटनांतून हातमागाच्या कापडाचा मोठा साठा पडून आहे. ह्या मालाची किंमत सुमारें ४·२० कोटी रुपये असून त्याच्या उठावासाठी मद्रास सरकारनें कांहीं योजना जाहीर केल्या आहेत. मात्र त्यांचा फायदा फक्त सहकारी संघटनांनाच मिळूं शकेल. खाजगी मालकीच्या हातमाग धंद्याजवळहि सुमारें ४० कोटी रुपयांचें कापड पडून आहे. मद्रास राज्य हातमाग विणकर सहकारी संघटनेला प्राथमिक सहकारी संघटनांकडून कापड विकत घेणें शक्य व्हावें म्हणून राज्य सरकार ५० लाख रुपयांचें कर्ज देणार आहे. कापडाच्या विक्रींत प्राथमिक संघटनांना तोटा आल्यास कांहीं मर्यादेपर्यंत तो भरून देण्याची हमीहि राज्य सरकारनें घेतली आहे.

---

### सरबराई फक्त विदेशी गिऱ्हाइकांची

फर्म्सच्या सरबराईच्या खर्चावर नियंत्रण घालणारीं ग्रेटब्रिटनच्या फिनॅन्स बिलांतील कलमें पार्लमेंटनें मंजूर केलीं आहेत. परदेशी ग्राहकांसाठीच सरबराईचा खर्च केला, असें सिद्ध करणाऱ्या फर्मलाच ह्यापुढें अशा खर्चाला प्राप्तिकरांतून माफी मिळेल.

---

चहाच्या उत्पादनांत वाढ—१९६४ सालीं भारताच्या चहाच्या उत्पादनाच्या बाबतींत उच्चांक गांठण्यांत आला. चहाच्या जागतिक बाजारपेठेंतील अधिकाधिक भाग काबीज करून परदेशीय चलनाची प्राप्ति मोठ्या प्रमाणावर करून घेण्यासाठी चहाचें उत्पादन व निर्यात वाढविण्याची अतिशय गरज आहे. शिवाय उत्पादन वाढल्यामुळें त्याचा खर्चहि कमी करण्यास मदत होते. चौथ्या पंचवार्षिक कार्यक्रमांत चहाच्या उत्पादनाचें उद्दिष्ट १०० कोटी पौंडांचें ठरविण्यांत आलें आहे. चहाच्या निर्मितीच्या बाबतींतील हें उद्दिष्ट महत्त्वाकांक्षी असलें तरी तें गांठणें अशक्य नाहीं.


महाराष्ट्रांतील व्यापारी व व्यवस्थापकीय शिक्षणाची आद्य संस्था

## डेक्कन इन्स्टिटयूट ऑफ कॉमर्स

संस्थापक: प्रा. ग. कृ. भोपटकर, एफ्. सी. आय.
स्थापना: १९१८] [टेलिफोन नं. ५४९६०
७१७ बुधवार पेठ, जिजामाता बागेसमोर, पुणें २.
जी. सी. डी., डी. कॉम., एल. सी. सी., जी. डी. सी. ॲन्ड ए., सी. ए. आय. आय. बी., ए. आय. सी. डब्ल्यू. ए., (कॉस्टिंग), भारत सरकारच्या कंपनीच्या सेक्रेटरी परीक्षा, लायसेन्शिएट इन्शुअरन्स परीक्षा, शॉर्टहँड, इंग्रजी-मराठी टाईपरायटिंग, पुणें विद्यापीठाच्या एक्स्टर्नल प्री-डिग्री कॉमर्स व बी. कॉम. डिग्री कोर्स आणि इन्स्टिटयूटचा बँकर्स प्रॅक्टिकल ट्रेनिंग कोर्स.

२४ जून, १९६५ पासून वर्ग सुरू होतील.

—खास वैशिष्ट्यें—

★ सकाळ-संध्याकाळ-दुपारचे वर्ग.
★ इंग्रजी-मराठींतून अध्यापनाची सोय.
★ एस्. एस्. सी., अंडर-ग्रॅज्युएट्स् व ग्रॅज्युएट्स् अशा सर्वांना योग्य असे अभ्यासक्रम.
★ बँकेंत नोकरी करणाऱ्या वा नोकरी करूं इच्छिणाऱ्यांसाठी ३ महिन्यांचा बँकर्स प्रॅक्टिकल ट्रेनिंग कोर्स.
★ बी. कॉम्. एक्स्टर्नल डिग्रीच्या अभ्यासाची संपूर्ण सोय.



D. E. Society's

## Brihan Maharashtra College of Commerce, Poona 4.

The College will re-open on 21st June 1965 for the academic year 1965-66. Students seeking admission to Pre-Degree, B. Com. Part I, S. Y., T. Y., B. Com. Classes should apply immediately. Forms of admission and copies of the prospectus are available in the College Office between 11 a. m. and 2 p. m. on all working days. B. A. Students wishing to study for the B. Com. degree should apply immediately after the result is declared.

Principal



## Fergusson College, Poona 4.

The College will reopen on the 21st June, 1965. Applications for admission should be made in the prescribed form immediately after the results of the qualifying examination are declared.

Poona
May 21, 1965.

V. G. Mainkar
Principal

### खाजगी विभागांतील हिंद–अमेरिका सहकार्य

प्रसिद्ध उद्योगपति श्री. जी. डी. बिर्ला अमेरिकन भांडवलदारांची मदत मिळण्याची शक्यता अजमावण्यासाठी अमेरिकेला गेले होते. त्यांना ह्या कामीं कांहींसें यश आलें आहे. अमेरिकेंतील कैसर औद्योगिक संघटनेच्या मदतीनें भारतांत ३ लाख टन बिडाचें लोखंड तयार करणारा कारखाना काढण्याचा करार त्यांनीं त्या संघटनेशीं केला आहे. ह्या कराराला सरकारची मंजुरी मिळवावी लागेल. ती मिळाल्यास १९६७ पासून सदर कारखाना उत्पादन करूं लागेल. कारखाना उभारण्याच्या कामीं ३ कोटी डॉलर्स भांडवल लागेल. त्यापैकी २० टक्के भांडवल कैसर संघटना पुरविणार आहे. ह्या कारखान्याचा विस्तार करून त्यांत विशष प्रकारचें पोलाद निर्माण करण्याचा श्री. बिर्ला ह्यांचा उद्देश आहे. कारखान्यांत जळण म्हणून कोळशाचा उपयोग न करतां विजेचा उपयोग करण्यांत येणार आहे. विजेचा उपयोग करून बिडाचें लोखंड तयार करण्याच्या कसबांत नॉर्वेजिअन तंत्रज्ञ विशेष नांवाजलेले आहेत. त्यांच्या तांत्रिक ज्ञानाची मदत घेण्यांत येणार आहे. कैसर औद्योगिक संघटनेच्या मदतीनें श्री. बिर्ला अल्युमिनम तयार करण्याचा एक कारखानाहि काढूं पाहात आहेत. ह्या कारखान्याची प्रारंभीची उत्पादनक्षमता २० हजार टनांची असेल, पण नंतर त्याचा विस्तार करण्यांत येऊन उत्पादनक्षमता १ लाख, २० हजार टनांपर्यंत वाढविण्याचा विचार आहे. गोवा भागांत स्वताचा कारखाना काढण्यासाठीहि एका अमेरिकन कारखान्याची मदत श्री. बिर्ला ह्यांनीं मिळविली आहे. संकल्पित कारखान्याची उत्पादनक्षमता २ लाख टनांची असेल.

### सिमेंटच्या कारखान्यांतील परदेशीय भाग


सिमेंटचे कारखाने उभारण्यास लागणाऱ्या यंत्रसामग्रीची पाहणी करण्याचें काम भारत सरकारच्या सिमेंट कॉर्पोरेशननें केलें आहे. पाहणींत असें दिसून आलें कीं, प्रत्येक सिमेंट कारखान्याच्या उभारणींत १० लाख रुपयांच्या परदेशीय चलनाची बचत करतां येईल. आतांपर्यंत प्रत्येक कारखान्यांत ४५ लाख रुपयांची परदेशीय यंत्रसामग्री वापरावी लागत असे. ही यंत्रसामग्री देशांतच बनविणें शक्य आहे असें आतां आढळून आलें आहे. चौथ्या पंचवार्षिक कार्यक्रमांत सार्वजनिक विभागांत सिमेंटचे कारखाने काढून ५० लाख टन सिमेंटच्या उत्पादनाची व्यवस्था करण्याचा विचार कॉर्पोरेशन करीत आहे.

### पाकिस्तानला अमेरिकेची समज

कच्छच्या रणांत भारतावर केलेल्या आक्रमणांत पाकिस्ताननें अमेरिकन शस्त्रास्त्रांचा उपयोग केल्याची तक्रार भारतानें अमेरिकेकडे केली होती. मदत म्हणून दिलेल्या रणसाहित्याचा असा उपयोग केल्याबद्दल आणि चीनशीं जवळिकीचे संबंध प्रस्थापित केल्याबद्दल अमेरिकेनें पाकिस्तानला समज दिल्याची वार्ता आहे. भारताची तक्रार आल्यावर अमेरिकेने रणांगणाच्या दोन्हीं बाजूंना आपले निरीक्षक धाडले होते. भारताने अमेरिकन शस्त्रास्त्रांचे युद्धभूमीवर घेतलेले फोटोहि अमेरिकेकडे पाठविले होते. अमेरिकन निरीक्षक येण्याच्या दिवशीं पाकिस्ताननें रणांतील अमेरिकन रणसाहित्य काढून घेतलें होतें. पण, नंतर तें कसेंहि वापरावयाचा हक्क आपणास आहे असा दावा केला होता.




ठाकरसी फॅब्रिक्स
फॅशनसाठी सर्वोत्तम पसंती; सॅन्फोराइज्ड कापड SANFORIZED
सूटिंग, शर्टिंग, सुंदर, साधे आणि
डिझाइन्सचे, तऱ्हेतऱ्हेचे कापड असे हे आवडते पुरुषांचे
THACKERSEY FABRICS
ठाकरसी ग्रूप ऑफ मिल्स •श्री क्राउन स्पिनिंग ॲण्ड मॅन्युफॅक्चरिंग कं. लि. •श्री इंडियन मॅन्युफॅक्चरिंग कं. लि. •श्री हिंदुस्तान स्पिनिंग ॲण्ड वीव्हिंग मिल्स कं. लि.

BUT FOR KEY APPLICATION TO MACHINES
Make doubly sure by fitting

MANUFACTURERS OF MACHINE SPARE PARTS & TOOLS
GADRE BANDHU
MADHAVNAGAR (S.R.)
INDIA


हें पत्र पुणें पेठ शिवाजीनगर घ. नं. ९१५/१ आर्यभूषण छापखान्यांत या वृत्तपत्राचे मालक श्री. श्रीपाद वामन काळे यांनीं छापिलें व 'दुर्गाविवास' ८२३ शिवाजीनगर (पो. ऑ. डेक्कन जिमखाना), पुणें ४, येथें प्रसिद्ध केलें.